# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

**(स्वायत्त)** (ISO:9001:2008)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. २६४७१२५५ (का.) फॅक्स - ०२२-२६४७७२१७

email : director@msbte.com Web : www.msbte.com


---

**अधिसूचना** जा.क्र.मरातंशिमं/का-१०/अधिसूचना/अमुअ/२०११/33

अल्पमुदतीचे शासनमान्य दिनांक - 01 FEB 2011

म.रा.तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित पदविका अभ्यासक्रम

संदर्भ - शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. मान्यता २००९/(१८२/०९)/तांशि-५,
दिनांक २६ फेब्रुवारी २०१०

संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत नसलेल्या तथापि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील शासन मान्य विविध अल्प मुदतीचे पदविका/पदविकोत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरू करणे, अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या मान्यतेस मुदतवाढ देणे, अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, प्रवेशक्षमतेत बदल, नावात बदल, स्थानांतरण, संस्था बंद करणे, यासंबंधी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. (२०१०-११ या शैक्षणिक वर्षापुर्वी ज्या संस्थांना शासनाची मान्यता मिळालेली आहेअशा सर्व संस्थांना सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या मान्यतेच्या मुदतवाढीसाठी अर्ज करणे बंधनकारक आहे.)

त्याकरिता इच्छुक नोंदणीकृत ट्रस्ट/संस्थांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना व मान्यता प्रक्रिया पुस्तिका (Approval Process Manual) मंडळाच्या www.msbte.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच मान्यता प्रक्रिया पुस्तिका (Approval Process Manual) सी.डी. स्वरूपात मंडळाच्या विभागीय कार्यालयात रू.१००/- देऊन उपलब्ध आहे.

अर्ज दाखल करू इच्छिणाऱ्या संस्थांनी मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला विहीत नमुन्यातील अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रांसह मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करून सदर अर्जाची एक प्रत आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई येथे सादर करणे आवश्यक आहे.

नवीन संस्था सुरु करण्याच्या अर्जासोबत रू. ५,०००/- चा धनाकर्ष विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. तसेच विलंब शुल्कासह अर्ज सादर करावयाचा असल्यास रु.७,०००/ - (रु.५,००० नियमित शुल्क + रु.२,०००/- विलब शुल्क)चा धनाकर्ष विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या मान्यतेस मुदतवाढ देणे, अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, प्रवेशक्षमतेत बदल, नावात बदल, स्थानांतरण, संस्था बंद करणे इ. करिता अर्जासोबत मान्यता प्रक्रिया पुस्तिकेत नमूद केलेल्या Application & Processing Fee च्या रकमेचा धनाकर्ष विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

मुंबई विभागामधील संस्थांनी धनाकर्ष "सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई" यांच्या नांवे मंडळाच्या मुंबई विभागीय कार्यालयात द्यावा. मुंबई वगळता अन्य विभागातील संस्थांनी "उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, संबंधित विभागीय कार्यालय" यांच्या नांवे धनाकर्ष मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालय येथे द्यावा.

अर्ज सादर करणेचे व त्याअनुषंगिक इतर प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | (अ) अर्ज आवश्यक कागदपत्रांसह मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयात सादर करण्याचा कालावधी | १४-०२-२०११ ते ८-०३-२०११ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| | (ब) अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधीत विभागीय कार्यालयात विलंब शुल्कासह सादर करण्याचा कालावधी | ९-०३-२०११ ते १५-०३-२०११ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| २. | संस्थेने विभागीय छाननी समितीसमोर संस्थेची व कागदपत्रांची माहिती सादर करावयाचा कालावधी | २१-०३-२०११ ते ३१-०३-२०११ |
| ३. | विभागीय छाननी समितीकडून संस्थेला त्रुटी कळविण्याचा कालावधी | २२-०३-२०११ ते ०२-०४-२०११ |
| ४. | संस्थेने त्रुटींबाबत आवश्यक कागदपत्र सादर करून समितीसमोर अहवाल सादर करण्याचा कालावधी | २५-०३-२०११ ते ०६-०४-२०११ |

सूचना

१. मंडळाने विहित केलेल्या मान्यता प्रक्रिया पुस्तिकेनुसार नवीन संस्थांना मान्यता देणेबाबत, अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या मान्यतेस मुदतवाढ देणे, तसेच अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेत बदल, नावात बदल, स्थानांतरण, संस्था बंद करणे इत्यादीबाबत कार्यवाही केली जाईल. संस्थेने मान्यता प्रक्रिया पुस्तिकेमधील नमूद सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

२. अ) नवीन तंत्र संस्था सुरु करणा-या संस्थांनी मान्यता प्रक्रिया पुस्तिकेतील प्रकरण १ व त्यातील वेळापत्रक (शेड्युल) पहावे.
ब) २०१०-११ या शैक्षणिक वर्षापुर्वी शासनमान्यता मिळालेल्या सर्व संस्थांना मान्यतेच्या मुदतवाढीसाठी मान्यता प्रक्रीया पुस्तिकेतील प्रकरण २ व त्यातील वेळापत्रक (शेड्युल) पहावे.

३. कागदपत्रांची माहिती सादर करण्याकरिता संस्थेने संबंधीत विभागीय कार्यालयाकडून तारीख व वेळ निश्चित करून घ्यावी. याबाबत कोणत्याही संस्थेस लेखी कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

४. एल.ओ.आय. व एल.ओ.ए. प्राप्त संस्थांची माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात येईल.

५. कुठल्याही संस्थेने मंडळाची संलग्नता मिळाल्याशिवाय विद्यार्थ्यांचे प्रवेश करू नयेत.

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयांची माहिती.** (अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे www.msbte.com संकेत स्थळ पहावे.)

| अ. क्र. | विभागीय कार्यालयाचे नांव व पत्ता | विभागांतर्गत येणारे जिल्हे | दूरध्वनी/फॅक्स क्रमांक | धनाकर्ष कोणाच्या नांवे पाठवावा |
|---|---|---|---|---|
| १. | प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग<br>महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,<br>शासकीय तंत्रनिकेतन इमारत,<br>४९, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग,<br>बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. | मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड | दूरध्वनी -<br>(०२२) २६४७ ३२५३<br>फॅक्स -<br>(०२२) २६४७ ३२५४ | सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| २. | उपसचिव<br>महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ<br>विभागीय कार्यालय,<br>४१२-ई, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय इमारत,पहिला मजला, शिवाजी नगर,<br>बहिरट पाटील चौक, पुणे-४११ ०१६. | रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर | दूरध्वनी - (०२०) २५६५६९९४<br>फॅक्स - (०२०) २५६५२३०८ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे |
| ३. | उपसचिव<br>महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ<br>विभागीय कार्यालय,<br>शासकीय तंत्रनिकेतन परिसर, स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१ ००५. | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, नंदूरबार | दूरध्वनी -<br>(०२४०) २३३१२७३<br>फॅक्स -<br>(०२४०) २३४१६६१ | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, औरंगाबाद |
| ४. | उपसचिव<br>महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ<br>विभागीय कार्यालय,<br>शासकीय तंत्रनिकेतन परिसर,<br>सदर, नागपूर-४४० ००१. | नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, भंडारा, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा | दूरध्वनी -<br>(०७१२) २५६२२८३६<br>फॅक्स -<br>(०७१२) २५६०३५० | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, नागपूर |

(गु. भी. धनोकार)<br>
संचालक<br>
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई